Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सत्याचे प्राईम्स

सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

सचिन कुमावत यांचे नांदगावात जल्लोषात स्वागत!

(पान २ वर)



। शनिवार, दि. १७ ऑक्टोंबर २०२६ । वर्ष १ । अंक १८७ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

अभिजीत दिपके आणि विद्यार्थी नेत्या नेहा बोरा यांना पोलिसांनी घेतले ताब्यात

'लहरा दो तिरंगा' मोर्चापूर्वी दिपके ताब्यात!

सौरव दास, आशुतोष रांका तुरुंगात, 'प्लॅन बी' तयार असल्याचा संघटनेचा दावा

जन सम्राट टाईम्स

दिल्ली | दिल्लीतील कॅनॉट प्लेस परिसरात आयोजित करण्यात येणाऱ्या 'लहरा दो तिरंगा' मोर्चापूर्वी कॉक्रोच जनता पार्टीचे (CJP) संस्थापक अभिजीत दिपके आणि विद्यार्थी नेत्या नेहा बोरा यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. मोर्चाला परवानगी नाकारल्याची नोटीस बजावल्यानंतर अभिजीत दिपके यांना तासाभरातच ताब्यात घेण्यात आल्याचे वृत्त 'इंडिया टुडे'ने दिले आहे.

पक्षाचे प्रमुख नेते पोलिसांच्या ताब्यात किंवा तुरुंगात असल्याने संघटनेसमोर नेतृत्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. मात्र, अशा परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी 'प्लॅन बी' तयार असल्याचा दावा पक्षाच्या वतीने करण्यात आला आहे.कॅनॉट प्लेस येथे शुक्रवारी 'लहरा दो तिरंगा' मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चाला परवानगी नाकारण्यात आल्याची नोटीस पोलिसांकडून बजावण्यात आली. त्यानंतर अभिजीत दिपके यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली. विद्यार्थी नेत्या नेहा बोरा यांनाही ताब्यात घेण्यात आल्याचे वृत्त आहे.



या कारवाईमुळे मोर्चाचे नेतृत्व कोण करणार आणि नियोजित आंदोलन पुढे कसे जाणार, याबाबत चर्चा सुरू झाली आहे. संघटनेचे प्रमुख चेहरे पोलिसांच्या ताब्यात असल्याने आंदोलनाच्या नियोजनावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अभिजीत दिपके यांना ताब्यात घेण्याच्या काही मिनिटे आधी CJPच्या मीडिया टीमचे प्रतिनिधी विजय एम यांनी पक्षाची भूमिका स्पष्ट केली होती. १० ऑक्टोबर रोजी झालेल्या आंदोलनाप्रमाणे यावेळीही ऐनवेळी वापरण्यासाठी पर्यायी रणनीती तयार असल्याचे त्यांनी सांगितले. दिल्ली पोलिसांनी अभिजीत दिपके यांना रोखले किंवा ताब्यात घेतले, तर पक्षाकडून नवी रणनीती जाहीर केली जाईल, असेही त्यांनी म्हटले होते. त्यामुळे आता संघटनेचा कथित 'प्लॅन बी' नेमका काय आहे आणि त्यानुसार आंदोलनाची पुढील दिशा काय असेल, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेत (SIR) कथित गैरप्रकार झाल्याचा आरोप करत CJPने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. या मुद्द्यावरून पक्षाने सरकार आणि निवडणूक यंत्रणेवर टीका केली आहे. पक्षाचे नेते सौरव दास आणि आशुतोष रांका यांना या आठवड्यात अटक करण्यात आल्याचे वृत्त आहे. त्यांच्या अटकेचा निषेध करण्यासाठी 'लहरा दो तिरंगा' मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे या आंदोलनाला राजकीय आणि निवडणूक प्रक्रियेशी संबंधित मुद्द्यांची पार्श्वभूमी लाभली आहे.

मोदी-शाहांवर टीका; आणखी आंदोलनाचा इशारा

अभिजीत दिपके यांना ताब्यात घेतल्यानंतर CJPच्या 'एक्स' हँडलवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर टीका करण्यात आली. आणखी किती जणांना अटक केली जाणार, असा सवाल पक्षाने उपस्थित केला. दिपके यांना बेकायदेशीरपणे ताब्यात घेतल्याचा आरोपही संघटनेने केला. प्रत्येक अटकेनंतर आणखी युवक रस्त्यावर उतरतील, असा इशारा पक्षाने दिला आहे. मात्र, पोलिसांच्या कारवाईबाबत आणि ताब्यात घेण्याच्या कायदेशीर आधाराबाबत अधिकृत बाजू समोर येणे महत्त्वाचे ठरणार आहे. पक्षाच्या प्रमुख नेत्यांवरील कारवाईनंतर CJP आंदोलनाची धुरा कोणाकडे सोपवते आणि 'प्लॅन बी'नुसार पुढे कोणती भूमिका घेते, हे आगामी घडामोडींमध्ये स्पष्ट होईल.

Selected

मुंबई मेट्रोचा भन्नाट उपक्रम

मुंबई । मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने (MMRC) मुंबई मेट्रो लाईन ३ (ॲक्वा लाइन) वरील दहा स्थानकांवर आजपासून ॲक्वा लाइन पासपोर्टची विक्री सुरू केली आहे. हा ॲक्वा लाइन पासपोर्ट कफ परेड, चर्चगेट, हुतात्मा चौक, सीएसएमटी मेट्रो, वरळी, सिद्धिविनायक, धारावी, वांद्रे-कुर्ला संकुल (बीकेसी), सीएसएमआयए-टी२ आणि मरोळ नाका या मेट्रो स्थानकांवर उपलब्ध आहे.'ॲक्वा लाइन पासपोर्ट अँड स्टॅम्प ट्रेल' या उपक्रमांतर्गत सुरू करण्यात आलेला हा मर्यादित आवृत्तीचा ॲक्वा लाइन पासपोर्ट प्रवासी, मेट्रोप्रेमी, पर्यटक आणि मुंबईला भेट देणाऱ्यांना मुंबईतील पहिल्या भूमिगत मेट्रो मार्गिकेचा अनुभव घेताना विशेष स्थानक स्टॅम्प संकलित करण्याची अनोखी संधी देतो. या ॲक्वा लाइनवर आधारित पासपोर्टची किंमत २५० रुपये आहे.

शासकीय काम करताना निव्वळ नोकरी नको ; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत थेट पोहोचवण्यासाठी राबविण्यात येणारे 'सेवा संकल्प अभियान' हे केवळ महिनाभरापुरते मर्यादित न राहता निरंतर सुरू राहिले पाहिजे, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज 16 ऑक्टोबर रोजी सांगितले. नागरिकांना त्यांचा हक्क आणि शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देणे ही प्रशासनाची जबाबदारी असून, प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्याने संवेदनशीलतेने काम करण्याची गरज आहे. असे एकनाथ शिंदे म्हणाले.या अभियानांतर्गत विविध विभागांच्या माध्यमातून २६ प्रकारच्या योजनांचा लाभ पात्र नागरिकांना देण्यात येत असून, सुमारे दीड लाख लाभार्थ्यांपर्यंत या अभियानाचा लाभ पोहोचविण्याचे उद्दिष्ट आहे. आरोग्य, महिला व बालविकास, शिक्षण, समाजकल्याण, कृषी, पशुसंवर्धन, पाणीपुरवठा आदी विविध विभागांचा या अभियानात सहभाग आहे. विद्यार्थ्यांसाठी सायकली, शालेय साहित्य, संगणक, लॅपटॉप, वॉटरकूलर यांसह विविध स्वरूपातील मदतही या माध्यमातून केली जात आहे. गेल्या महिनाभरापासून जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद आणि विविध शासकीय विभागांनी या अभियानासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले. त्यामुळे मोठ्या संख्येने लाभार्थ्यांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचवता आला. या कामासाठी सर्व विभागांचे अभिनंदन करून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे आभार मानले.'सरकार आपल्या दारी'च्या धर्तीवर सर्वसामान्य नागरिकांना शासनाच्या योजनांचा लाभ त्यांच्या दारापर्यंत मिळाला पाहिजे, अशी



भूमिका त्यांनी मांडली. नागरिक एखादी तक्रार किंवा समस्या घेऊन शासकीय कार्यालयात आल्यानंतर त्याचे म्हणणे ऐकून घेणारा आणि समस्या समजून घेणारा अधिकारी त्याला भेटला पाहिजे. प्रत्येक काम शक्य होईलच असे नाही; मात्र नागरिकाला सन्मानाने वागणूक देणे आणि त्याची समस्या समजून घेणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सेवा संकल्प अभियानाची प्रेरणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सेवाभावी कार्यातून मिळाली, असेही शिंदे यांनी सांगितले. मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या सेवेला अधोरेखित करत त्यांनी 'राष्ट्र प्रथम' या विचारातून देशाला विकासाच्या दिशेने नेण्याचे काम सुरू असल्याचे नमूद केले. यावेळी राज्यातील शेतकरी संकटाचाही त्यांनी उल्लेख केला. अतिवृष्टी आणि दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या पाठीशी राज्य सरकार ठामपणे उभे असून, मंत्रिमंडळाने शेतकऱ्यांना तातडीची ५ हजारांची अग्रिम मदत देण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. केंद्र आणि राज्य सरकारच्या समन्वयातून शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.तरुणांना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावरही सरकारचा भर असल्याचे शिंदे यांनी सांगितले. कौशल्य विकास, स्टार्टअप आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून तरुणांच्या हाताला काम देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.असे सांगत प्रशासनाने सर्वसामान्यांशी आपुलकीने आणि संवेदनशीलतेने वागावे, असे आवाहन त्यांनी केले. सेवा संकल्प अभियान हा केवळ एक शासकीय कार्यक्रम नसून सामान्य नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्याचा सातत्यपूर्ण उपक्रम आहे गडकरी रंगायतन येथे आयोजित सेवा संकल्प अभियानाच्या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, यावेळी खासदार नरेश म्हस्के, आमदार रवींद्र फाटक, बदलापूरच्या नगराध्यक्षा रुचिता घोरपडे, कोकण विभागीय आयुक्त रूबल अग्रवाल, ठाणे मनपा आयुक्त सौरभ राव, ठाण्याचे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव, निवासी उपजिल्हाधिकारी संदीप माने आणि जिल्ह्यातून आलेले लाभार्थी उपस्थित होते.

एसटी कर्मचाऱ्यांचा ६ नोव्हेंबरपासून राज्यव्यापी संपाचा इशारा

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: महाराष्ट्राची जीवनवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'लालपरी' च्या प्रवाशांसाठी ऐन दिवाळीच्या तोंडावर एक चिंताजनक बातमी समोर आली आहे. सणासुदीच्या काळात सुरक्षित आणि सोयीस्कर प्रवासासाठी लाखो नागरिक एसटीला पसंती देतात. मात्र, यंदाच्या दिवाळीत प्रवाशांचे हाल होण्याची शक्यता आहे. आपल्या प्रलंबित मागण्या मान्य न झाल्यास ६ नोव्हेंबरपासून राज्यव्यापी संप पुकारण्याचा इशारा एसटी कर्मचाऱ्यांनी राज्य सरकारला दिला आहे. विविध संघटनांनी मुख्यमंत्र्यांना नुकतेच एक सविस्तर निवेदन पाठवले आहे.दिवाळीच्या काळात चाकरमानी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने आपल्या गावी परतत असतात. अशावेळी एसटी गाड्यांना सर्वाधिक गर्दी असते. जर सरकारने एसटी कर्मचाऱ्यांच्या या मागण्यांवर वेळीच तोडगा काढला नाही आणि कर्मचारी ६ नोव्हेंबरला संपावर गेले, तर संपूर्ण महाराष्ट्रातील रस्ते वाहतूक आणि एसटीची सेवा पूर्णपणे विस्कळीत होईल. यामुळे ऐन सणासुदीत सर्वसामान्यांचे प्रचंड हाल होऊ शकतात. दुष्काळाच्या झळांनी होरपळणारा शेतकरी,आर्थिक ओढाताण सहन करणारा सर्वसामान्य नागरिक आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करताना होणारी दमछाक, अशा परिस्थितीत जनतेवर भाडेवाढीचा



अतिरिक्त भार कशासाठी, असा सवाल उपस्थित करत परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिवाळीच्या गर्दीच्या हंगामासाठी प्रस्तावित केलेली १५ टक्के हंगामी भाडेवाढ नामंजूर केली. गर्दीच्या काळात एसटीच्या प्रवासी भाड्यात हंगामी वाढ केली जाते. यंदाही १ ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत प्रवासी भाड्यात सरसकट १५ टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव एसटी प्रशासनाने मंत्री सरनाईक यांच्याकडे सादर केला होता. मात्र, आधीच आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या जनतेवर आणखी भार टाकणे योग्य नसल्याची भूमिका घेत त्यांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला. 'आधीच संकटांनी घेरलेल्या जनतेला भाडेवाढीचा चटका देऊन त्यांच्या जखमेवर मीठ चोळणे मला मान्य नाही,' असे स्पष्ट करत त्यांनी जनहिताला प्राधान्य दिले.दुष्काळाच्या झळांनी होरपळणारा शेतकरी, महागाईमुळे आर्थिक ओढाताण सहन करणारा सर्वसामान्य नागरिक आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करताना होणारी दमछाक, अशा परिस्थितीत जनतेवर भाडेवाढीचा अतिरिक्त भार कशासाठी, असा सवाल उपस्थित करत परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिवाळीच्या गर्दीच्या हंगामासाठी प्रस्तावित केलेली १५ टक्के हंगामी भाडेवाढ नामंजूर केली. दरवर्षी दिवाळीच्या गर्दीच्या काळात एसटीच्या प्रवासी भाड्यात हंगामी वाढ केली जाते.

जबरी चोरी करणारी टोळी गजाआड!

वाशिम: जिल्ह्यात रात्रीच्यावेळी बंद घरांचे कुलूप तोडून सोन्या-चांदीचे दागिने आणि रोकड चोरी करणाऱ्या कुख्यात आंतरराज्यीय चड्डी-बनियन टोळीला वाशिम स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले. या कारवाईमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली असून, तब्बल ७घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले. तसेच पोलिसांनी आरोपींकडून ६ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. माहितीनुसार, वाशिम जिल्ह्यात चड्डी बनियन घालून हातात धारदार शस्त्रे घेऊन चोऱ्या करणाऱ्या या टोळीची मोठी दहशत निर्माण झाली होती. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक निकेश खाटमोडे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तयार केले.

'बँका केवळ कर्ज देणाऱ्या संस्था नाहीत', राज्यपाल जिष्णु देव वर्मा

जन सम्राट टाईम्स

जळगाव | प्रतिनिधी: बँका आणि वित्तीय संस्था केवळ कर्ज देण्यापुरत्या मर्यादित नसून, त्या देशाच्या आर्थिक विकासात आणि राष्ट्रनिर्माणात महत्त्वाची भूमिका बजावतात. रोजगारनिर्मिती, उद्योगांना आर्थिक पाठबळ आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी त्यांचे योगदान निर्णायक आहे. विकसित भारत २०४७ चे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी वित्तीय क्षेत्राने महत्त्वाची भूमिका बजावावी, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले. मुंबईतील वरळी येथील फोर सीझन्स हॉटेलमध्ये असोचॅमतर्फे आयोजित २१ व्या वार्षिक बँकिंग व वित्तीय क्षेत्र परिषद आणि पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. 'रेझिलियन्स, रिइन्व्हेन्शन अँड इंडियाज राईज' ही या परिषदेची संकल्पना होती. यावेळी बँकिंग आणि वित्तीय सेवा क्षेत्रातील मान्यवर, उद्योग प्रतिनिधी आणि धोरणकर्ते उपस्थित होते. राज्यपाल म्हणाले की, प्रधानमंत्री जनधन योजना, आधार आधारित सेवा, थेट लाभ हस्तांतरण आणि UPI यांमुळे देशातील वित्तीय व्यवहार अधिक सुलभ आणि पारदर्शक झाले आहेत.

कोट्यवधी नागरिकांना औपचारिक बँकिंग व्यवस्थेशी जोडण्यात यामुळे मदत झाली आहे.मात्र, वित्तीय समावेशन म्हणजे केवळ बँक खाते उघडणे किंवा डिजिटल पेमेंट करणे नव्हे. ग्रामीण कुटुंबे, गरीब नागरिक आणि लहान उद्योजकांना परवडणारे कर्ज, विमा आणि निवृत्तिवेतन यांसारख्या सेवाही सहज उपलब्ध व्हायला हव्यात, असे त्यांनी स्पष्ट केले.त्रिपुराचे अर्थमंत्री असतानाचा अनुभव सांगताना वर्मा यांनी महिला बचत गटांच्या आर्थिक क्षमतेचा उल्लेख केला. सुरुवातीला या गटांना कर्ज देण्याबाबत बँका साशंक होत्या. मात्र, कर्जपुरवठा सुरू झाल्यानंतर महिलांनी कर्जफेडीत शिस्त दाखवल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे वित्तीय संस्थांनी महिलांच्या क्षमतेवर विश्वास ठेवून त्यांना अधिक संधी द्याव्यात, असे आवाहन त्यांनी केले.सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग देशात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करतात. मात्र, अनेक उद्योगांना वेळेवर आणि परवडणारे कर्ज मिळण्यात अडचणी येतात. बँका आणि बिगर बँकिंग वित्तीय संस्थांनी या उद्योगांसाठी नावीन्यपूर्ण वित्तपुरवठा योजना तयार कराव्यात, असे वर्मा म्हणाले. महाराष्ट्रात स्टार्टअप्सना भांडवल, खेळते भांडवल आणि लवचिक कर्जसुविधा उपलब्ध करून देण्याची मोठी संधी असल्याचेही त्यांनी नमूद केले. कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा ॲनालिटिक्स आणि डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे बँकिंग सेवा अधिक कार्यक्षम होत आहेत. मात्र, ग्राहकांचा विश्वास टिकवण्यासाठी सायबर सुरक्षा, डेटा गोपनीयता आणि प्रभावी तक्रार निवारण यंत्रणा मजबूत असणे आवश्यक आहे, असे राज्यपालांनी सांगितले. सरकार, बँका, वित्तीय संस्था आणि तंत्रज्ञान क्षेत्राने एकत्र काम करून सर्वसमावेशक वित्तीय व्यवस्था उभारावी, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते बँकिंग आणि वित्तीय क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या संस्थांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.



जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

सुनेत्रा पवारांना अर्थखाते द्या; राष्ट्रवादीची मागणी!

पुण्यात भाजप-राष्ट्रवादीची समन्वय बैठक; नाराजीच्या चर्चांवर राहुल कुल यांचे स्पष्टीकरण

जन सम्राट टाईम्स

पुणे । प्रतिनिधी: भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांची पुण्यात समन्वय बैठक पार पडली. या बैठकीनंतर महायुतीतील नाराजीच्या चर्चांना भाजप आमदार राहुल कुल यांनी पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला. बैठकीत सर्वांनी आपापली मते मांडली असून, दोन्ही मतदारसंघांतील महायुतीच्या उमेदवारांना पाठिंबा देऊन निवडून आणण्यासाठी एकत्रितपणे काम करण्याचा निर्णय झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे पुणे शहराध्यक्ष सुनील टिंगरे यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना राज्याचे अर्थखाते देण्यात यावे, अशी मागणी भाजपच्या नेत्यांकडे केली. 'बैठकीत कोणतीही नाराजी नव्हती'; राहुल कुल यांचे म्हणणे बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना आमदार राहुल कुल यांनी नाराजीच्या चर्चांवर भूमिका स्पष्ट केली. बैठकीत जिल्ह्यातील राजकीय परिस्थितीचा आढावा घेण्यात आला आणि सर्व नेत्यांनी आपापली मते मांडली. त्यानंतर महायुतीच्या दोन्ही उमेदवारांना मोठ्या ताकदीने पाठिंबा देऊन निवडून आणण्यासाठी एकमताने निर्णय घेण्यात आल्याचे कुल यांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते दत्तात्रय भरणे यांनीही पक्षाच्या वतीने उमेदवारांच्या विजयासाठी काम करण्याची भूमिका मांडल्याचे कुल यांनी नमूद केले. पुणे पदवीधर मतदारसंघाची जागा पारंपरिकरीत्या भाजपकडे



राहिली असून, या जागेबाबतचा निर्णय मुंबईत झालेला आहे. त्यामुळे यावर पुन्हा चर्चा करण्याऐवजी पक्षाच्या निर्देशानुसार एकजुटीने काम करण्यावर भर देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सुनेत्रा पवारांना अर्थखाते देण्याची मागणी दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे शहराध्यक्ष सुनील टिंगरे यांनी बैठकीतील महत्त्वाच्या मुद्द्यांची माहिती दिली. दोन्ही पक्षांचे नेते, आजी-माजी आमदार या बैठकीला उपस्थित होते. दोन्ही मतदारसंघांबाबत चर्चा करण्यासाठी ही समन्वय बैठक आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. सुनेत्रा पवार यांचा निरोप आल्यानंतर ही बैठक झाल्याचेही टिंगरे यांनी नमूद केले. राज्यातील खातेवाटपाच्या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसला महत्त्वाचे खाते मिळेल, असे सांगण्यात आले होते. त्यामुळे राज्याचे अर्थखाते सुनेत्रा पवार यांच्याकडे देण्यात यावे, अशी मागणी आपण बैठकीत केली असल्याचे टिंगरे यांनी स्पष्ट केले. ही मागणी भाजपच्या नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत पोहोचवावी, अशी विनंतीही करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. महायुतीतील समन्वयावर लक्ष अर्थखाते हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या हक्काचे असल्याची भूमिका मांडत टिंगरे यांनी या मागणीमागील पक्षाची भूमिका स्पष्ट केली. मात्र, अर्थखात्याबाबत अंतिम निर्णय काय होणार, याबाबत अद्याप स्पष्टता नाही.

काँग्रेसच्या नेत्यांची पुण्यात समन्वय बैठक

आता मुख्यमंत्री आणि महायुतीतील वरिष्ठ नेते या मागणीवर काय भूमिका घेतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. एकीकडे महायुतीतील नाराजीच्या चर्चांना राहुल कुल यांनी नकार दिला, तर दुसरीकडे अर्थखात्याच्या मागणीमुळे खातेवाटपाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांची पुण्यात समन्वय बैठक पार पडली.समन्वय बैठकीत उमेदवारांच्या समर्थनाबाबत एकमत झाल्याचे सांगण्यात आले असले, तरी अर्थखात्याबाबतचा निर्णय महायुतीतील पुढील राजकीय चर्चांमध्ये महत्त्वाचा ठरणार आहे.

सचिन कुमावत यांचे नांदगावात जल्लोषात स्वागत!

पत्रकार संघाकडून कुमावत आणि निर्माता-दिग्दर्शक सोनवणे यांचा जंगी सत्कार

जन सम्राट टाईम्स

नांदगाव । प्रतिनिधी : बिग बॉस मराठी सीझन ६मुळे चर्चेत आलेले खान्देशी अभिनेता सचिन कुमावत आणि प्रसिद्ध निर्माता-दिग्दर्शक संजय सोनवणे यांचे नांदगाव नगरीत उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. फटाक्यांची आतषबाजी, टाळ्यांचा कडकडाट आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद अशा जल्लोषपूर्ण वातावरणात दोन्ही कलावंतांचे आगमन झाले. यानिमित्ताने जनकल्याण मराठी पत्रकार संघाच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. खान्देशच्या मातीतून पुढे आलेल्या कलावंतांनी मराठी मनोरंजन क्षेत्रात आपली ओळख निर्माण केल्याचा अभिमान नांदगावकरांनी यावेळी व्यक्त केला. सचिन कुमावत यांनी बिग बॉसच्या घरात खान्देशी बोलीभाषा, संस्कृती आणि मातीशी असलेली नाळ जपल्यामुळे त्यांच्याबद्दल प्रेक्षकांमध्ये विशेष आकर्षण निर्माण झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. तर निर्माता-दिग्दर्शक संजय सोनवणे यांनी खान्देशी कथांना चित्रपटाच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करून देत स्थानिक कलाविश्वाला चालना दिली आहे. जनकल्याण मराठी पत्रकार संघाकडून सन्मान या स्वागत सोहळ्याचे आयोजन जनकल्याण मराठी पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले होते. संघाचे तालुकाध्यक्ष प्रज्ञानंद (बापू) जाधव यांच्या हस्ते सचिन कुमावत आणि संजय सोनवणे यांचा सन्मान करण्यात आला. खान्देशच्या कलावंतांनी आपल्या कलेच्या माध्यमातून परिसराचे नाव उज्ज्वल करावे आणि नव्या पिढीतील कलाकारांना प्रेरणा मिळावी, या भावनेतून हा सत्कार आयोजित करण्यात आल्याचे यावेळी



सांगण्यात आले. कार्यक्रमाला शिवसेनेच्या शिंदे गटाचे आमदार सुहास अण्णा कांदे यांचे बंधू किरण कांदे, सभापती यज्ञेश कलंत्री, रमेश (मामा) काकळीज, माजी सभापती विलास आहेर, पत्रकार विशाल पवार यांच्यासह पत्रकार संघाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. "नांदगाव हे माझे दुसरे घर!" सत्काराला उत्तर देताना अभिनेता सचिन कुमावत यांनी नांदगावकरांनी दिलेल्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. "नांदगाव हे माझे दुसरे घर आहे. येथील नागरिकांनी दिलेले प्रेम मी कधीही विसरणार नाही. लवकरच खान्देशच्या मातीतील एक भव्य प्रोजेक्ट घेऊन मी पुन्हा येईन," असे त्यांनी सांगितले. त्यांच्या या वक्तव्याला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. निर्माता-दिग्दर्शक संजय सोनवणे यांनीही नांदगावच्या कलाप्रेमी नागरिकांचे आभार मानले. स्थानिक कलाकार, खान्देशच्या कलावंतांमुळे सांस्कृतिक क्षेत्राला बळ या भेटीमुळे नांदगावच्या सांस्कृतिक वर्तुळात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

स्थानिक मातीतील कलाकार मनोरंजन क्षेत्रात यश मिळवून आपल्या भागाची ओळख राज्यभर पोहोचवत असल्याने युवा पिढीला प्रेरणा मिळत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. सचिन कुमावत यांच्या आगामी प्रकल्पाबाबतही उपस्थितांमध्ये उत्सुकता दिसून आली.मराठी सीझन ६मुळे चर्चेत आलेले खान्देशी अभिनेता सचिन कुमावत आणि प्रसिद्ध निर्माता-दिग्दर्शक संजय सोनवणे यांचे नांदगाव नगरीत उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. फटाक्यांची आतषबाजी, टाळ्यांचा कडकडाट आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद अशा जल्लोषपूर्ण वातावरणात दोन्ही कलावंतांचे आगमन झाले. यानिमित्ताने जनकल्याण मराठी पत्रकार संघाच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. खान्देशच्या मातीतून पुढे आलेल्या कलावंतांनी मराठी मनोरंजन क्षेत्रात आपली ओळख निर्माण केल्याचा अभिमान नांदगावकरांनी यावेळी व्यक्त केला.

संपादकीय

आला हिवाळा, आता दिल्लीतून पळा!

राजधानीच्या हवेत विषाचा विळखा; प्रदूषणापासून बचाव श्रीमंतांचा, तर विषारी हवा सहन करण्याची शिक्षा सामान्यांच्या वाट्याला दिल्लीच्या हिवाळ्याची ओळख कधीकाळी गुलाबी थंडी, धुक्यात हरवलेले रस्ते आणि सकाळच्या प्रसन्न वातावरणाशी जोडली जात होती. आज मात्र ऑक्टोबर महिना उजाडला की दिल्लीकरांना तापमानापेक्षा हवेच्या गुणवत्तेची चिंता अधिक सतावते.

एअर क्वालिटी इंडेक्स (AQI) किती आहे, घराबाहेर पडणे सुरक्षित आहे का, मास्क वापरावा का, एअर प्युरिफायर सुरू करावा का, अशा प्रश्नांनी नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा ताबा घेतला आहे. ज्यांच्याकडे पैसा आहे ते काही काळासाठी राजधानी सोडतात; ज्यांच्याकडे पर्याय नाही, ते त्याच विषारी हवेत श्वास घेण्याची शिक्षा भोगतात. ही केवळ पर्यावरणीय समस्या नाही, तर सार्वजनिक आरोग्य, सामाजिक विषमता आणि शासनाच्या उत्तरदायित्वाची गंभीर कसोटी आहे. थंडीची चाहूल नव्हे, प्रदूषणाच्या संकटाची घंटा! दिल्लीकरांसाठी ऑक्टोबर महिन्याची चाहूल आता निसर्गाच्या बदलत्या ऋतूची आनंदवार्ता घेऊन येत नाही, तर प्रदूषणाच्या वाढत्या धोक्याची पूर्वसूचना घेऊन येते. दिवसाचे तापमान उष्ण असले, तरी पहाटेच्या हवेत किंचित गारवा जाणवू लागला की अनेक कुटुंबे एअर प्युरिफायरची देखभाल, एन-९५ मास्कची खरेदी आणि घरातील खिडक्या-दारे बंद ठेवण्याची तयारी करू लागतात. काही जण घरातच व्यायाम करण्याचा पर्याय निवडतात, तर आर्थिक क्षमता असलेले नागरिक नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये काही काळ दिल्लीबाहेर राहण्याचे नियोजन करतात. कधीकाळी हिवाळ्याच्या आगमनाची वाट पाहणाऱ्या शहरात आज हिवाळा म्हणजे प्रदूषणाच्या संकटाचा हंगाम बनला आहे. तापमान किती घसरले, यापेक्षा हवेचा गुणवत्ता निर्देशांक किती वाढला, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरू लागला आहे. राजधानीच्या जीवनशैलीत झालेला हा बदल वरवर पाहता विनोदी वाटू शकतो; परंतु त्यामागील वास्तव भयावह आहे. माणसाला जगण्यासाठी आवश्यक असलेली हवा शुद्ध ठेवण्याची सामूहिक जबाबदारी असताना, स्वतःचा श्वास वाचवण्यासाठी नागरिकांना वैयक्तिक खर्च करावा लागतो, ही व्यवस्थेची मोठी शोकांतिका आहे. प्रदूषणाला सीमा नाहीत; मग उपाययोजनांना मर्यादा का? दिल्लीतील प्रदूषणाची कारणे अनेक स्तरांवर पसरलेली आहेत. पंजाब, हरियाणा आणि पश्चिम उत्तर प्रदेशातील काही भागांत पिकांचे अवशेष जाळल्याने हवेत प्रदूषक कणांचे प्रमाण वाढू शकते. मात्र, संपूर्ण प्रदूषणाचे खापर शेतकऱ्यांवर फोडून जबाबदारी झटकणे सोपे असले, तरी ते वास्तवाचे संपूर्ण चित्र नाही. दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील वाहनांचा धूर, बांधकामांमधून उडणारी धूळ, रस्त्यांवरील धूलिकण, औद्योगिक उत्सर्जन, कचरा जाळणे, डिझेल जनरेटर आणि इतर प्रदूषणकारी स्रोत यांचाही हवेच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. त्यातच हिवाळ्यातील प्रतिकूल हवामान, कमी वाऱ्याचा वेग आणि वातावरणाच्या खालच्या थरात प्रदूषक अडकून राहण्याची परिस्थिती निर्माण झाली, तर प्रदूषणाची तीव्रता वाढू शकते. म्हणूनच हा प्रश्न एका राज्याचा, एका सरकारचा किंवा एका घटकाचा नाही. प्रदूषणाचे स्रोत अनेक राज्यांत आणि विविध क्षेत्रांत असल्यामुळे त्यावरील उपायही समन्वित असणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना पर्यायी यंत्रणा, आर्थिक मदत आणि पीक-अवशेष व्यवस्थापनाचे व्यवहार्य पर्याय उपलब्ध करून देणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच वाहनांचे उत्सर्जन नियंत्रित करणे, बांधकामस्थळांवरील धूळ रोखणे, सार्वजनिक वाहतूक सक्षम करणे आणि औद्योगिक नियमांची काटेकोर अंमलबजावणी करणेही आवश्यक आहे. घोषणांपेक्षा अंमलबजावणी महत्त्वाची! प्रदूषण वाढले की बैठका होतात, निर्बंध जाहीर होतात, वाहनांवर नियंत्रणाचे उपाय सुचवले जातात आणि नागरिकांना सावधगिरीचे आवाहन केले जाते. परिस्थिती सुधारली की या उपाययोजनांचा वेग मंदावतो. पुढील हिवाळ्यात पुन्हा तेच संकट उभे राहते. ही वार्षिक पुनरावृत्तीच प्रशासनाच्या नियोजनातील त्रुटी दाखवते. प्रदूषण नियंत्रणासाठी केवळ तात्पुरते निर्बंध पुरेसे नाहीत.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी धुळ्यात विरोधक आक्रमक!

जन सम्राट टाईम्स



धुळे । | प्रतिनिधी : मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी धुळ्यात विविध विरोधी पक्ष आणि समविचारी संघटनांचे पदाधिकारी आक्रमक झाले आहेत. सलग तिसऱ्या दिवशी रस्त्यावर उतरून एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि सुरळीत व्हावी, तसेच मुख्य निवडणूक आयुक्तांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. निवडणूक आयोगाच्या कामकाजावर गंभीर आरोप आंदोलकांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते भारतीय जनता पक्षाला मदत करीत असल्याचा आणि त्यांच्या कार्यकाळात निवडणूक प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता होत असल्याचा आरोप विरोधकांनी केला. ज्ञानेश कुमार यांच्याविरोधातील आरोपांवरून भाजप त्यांना संरक्षण देत असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. निवडणूक आयोगाने निष्पक्षपणे काम करावे आणि निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास कायम राहावा, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली. हे आरोप आंदोलकांनी केले असून, त्यांची स्वतंत्र पुष्टी या वृत्तासाठी उपलब्ध नाही. विविध पक्ष आणि संघटना एकत्र धुळे येथे झालेल्या या आंदोलनात स्वाभिमानी क्रांती सेना, संविधान संरक्षण समिती, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसचा शरद पवार गट, शिवसेनेचा ठाकरे गट, बहुजन समाज पार्टी, महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्यासह विविध समविचारी पक्ष आणि संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, निष्पक्षता आणि लोकशाही मूल्यांच्या संरक्षणाचा मुद्दा उपस्थित करीत आंदोलकांनी मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची मागणी केली. सलग तिसऱ्या दिवशी आंदोलन सुरू राहिल्याने या मागणीसाठी विरोधकांचा दबाव वाढवण्याचा प्रयत्न दिसून आला. विविध पदाधिकाऱ्यांची उपस्थिती या धरणे आंदोलनात हरिश्चंद्र लोंढे, अतुल सोनवणे, युवराज करणकाळ, नंदकिशोर येलमामे, ॲड. संतोष जाधव, कॉम्रेड एल. आर. राव, रमेश श्रीखंडे, ॲड. रविकांत वाघ, सिद्धार्थ जगदेव, निंबा मराठे आणि प्राध्यापक बाबा हातेकर यांच्यासह विविध विरोधी पक्ष व समविचारी संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवडणूक आयोगाच्या कामकाजाबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांवर संबंधित यंत्रणा काय भूमिका घेते आणि आंदोलकांच्या मागण्यांवर पुढे काय घडते, याकडे लक्ष लागले आहे. धरणे आंदोलन करण्यात आले. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि सुरळीत व्हावी, तसेच मुख्य निवडणूक आयुक्तांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. निवडणूक आयोगाच्या कामकाजावर गंभीर आरोप आंदोलकांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

माजी पालकमंत्री गुलाबराव देवकर यांची ॲड. इक्बाल शेख व प्रदीप साळी यांनी घेतली सदिच्छा भेट

राजकीय वर्तुळात भेटीची चर्चा; सामाजिक कार्य आणि जनप्रश्नांच्या पार्श्वभूमीवर संवाद

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद । प्रतिनिधी : नशिराबादचे अपक्ष नगरसेवक ॲड. इक्बाल शेख आणि शिवसेनेचे माजी ग्रामपंचायत सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते प्रदीप अनिल साळी यांनी माजी पालकमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते गुलाबराव देवकर यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीमुळे नशिराबादच्या राजकीय व सामाजिक वर्तुळात चर्चेला सुरुवात झाली आहे. यावेळी स्थानिक राजकारण, सामाजिक उपक्रम आणि नशिराबादच्या विकासाशी संबंधित विषयांच्या पार्श्वभूमीवर संवाद झाल्याचे सांगण्यात आले. प्रदीप साळी यांचा राजकीय व सामाजिक प्रवास प्रदीप अनिल साळी हे गेल्या अनेक वर्षांपासून शिवसेनेत सक्रिय असून, २०१४ ते २०१९ या कालावधीत नशिराबाद ग्रामपंचायतीत शिवसेनेचे एकमेव सदस्य म्हणून त्यांनी प्रतिनिधित्व केले होते. त्यांनी जळगाव जिल्हा कामगार सेनेचे अध्यक्षपद, झिपरू अण्णा महाराज फाउंडेशनचे अध्यक्षपद तसेच नशिराबाद साळी समाजाचे अध्यक्षपद



अशी विविध पदे भूषवली आहेत. राजकीय कार्यासोबतच सामाजिक उपक्रमांमध्येही त्यांचा सहभाग राहिला आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या, युवकांचे प्रश्न, कामगारांना रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्न, रुग्णालयाशी संबंधित कामे, ज्येष्ठ नागरिकांच्या पेन्शन योजनांबाबत मदत आणि विविध सामाजिक प्रश्नांवर पुढाकार घेण्याच्या माध्यमातून त्यांनी स्थानिक पातळीवर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. युवकांशी असलेला संपर्क आणि सामाजिक कार्यातील सहभागामुळे ते नशिराबादमध्ये परिचित आहेत. ॲड. इक्बाल शेख यांना युवकांचा पाठिंबा नशिराबादचे अपक्ष नगरसेवक ॲड. इक्बाल शेख यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवत मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला. स्थानिक युवकांमध्ये त्यांना पाठिंबा असल्याचे त्यांच्या समर्थकांकडून सांगितले जाते. नगरसेवक म्हणून स्थानिक प्रश्न आणि नागरिकांच्या अपेक्षांच्या अनुषंगाने त्यांची भूमिका महत्त्वाची मानली जात आहे. ॲड. इक्बाल शेख आणि प्रदीप साळी यांच्या देवकर यांच्यासोबत झालेल्या भेटीमुळे स्थानिक राजकीय समीकरणांबाबत चर्चा सुरू झाली असली, तरी या भेटीतून कोणताही विशिष्ट राजकीय निर्णय किंवा आगामी राजकीय भूमिकेबाबत अधिकृत घोषणा झाल्याची माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे सध्या या भेटीकडे सदिच्छा भेट म्हणूनच पाहिले जात आहे. विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती या भेटीप्रसंगी शहराध्यक्ष गणेश भाऊ चव्हाण, नगरसेवक ॲड. इक्बाल शेख, प्रदीप साळी, विशाल झोपे, अरुण भोई, अनिल धनगर, फिरोज पिंजारी, आकाश निकम, हितेश राजपूत, सुरेश नाथ, पिंटू माळी, हितेश धनगर, गौरव नाथ, पंकज नाथ, प्रदीप बिल्हाडे, शैलेंद्र सपकाळे, विनायक भोई, रोहन वानखेडे, राजू मोची, अतफाब शेख, विशाल दिघे, सोनू खान, मनोज भाई, विकास भोई, योगेश साळी, काशिनाथ झोपे, रवि झोपे, संजय रंगमले, किरण बिन्हाडे, राहुल कुंभार, आसिफ भाई, शाकीर खान आदी उपस्थित होते. नशिराबादच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांच्या या भेटीकडे स्थानिक पातळीवर लक्ष दिले जात असून, आगामी काळात शहराच्या विकासाच्या प्रश्नांवर आणि नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी विविध नेत्यांमध्ये कोणत्या प्रकारचा संवाद घडतो, याबाबत उत्सुकता व्यक्त होत आहे.

न्यायासाठी लढा! न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे काळी फीत लावून मूक आंदोलन

जन सम्राट टाईम्स

भडगाव | प्रतिनिधी : सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देणाऱ्या न्यायव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक असलेले न्यायालयीन कर्मचारी आता स्वतःच्या प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलनाच्या पवित्र्यात उतरले आहेत. वेतनवाढ आणि सेवा सुविधांबाबत शासनाचे लक्ष वेधण्यासाठी भडगाव येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी १६ आणि १७ ऑक्टोबर रोजी शर्टाला काळी फीत लावून मूक निषेध नोंदवला. मागण्यांवर सकारात्मक निर्णय न झाल्यास १६ नोव्हेंबरपासून राज्यव्यापी बेमुदत संप पुकारण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाने दिला आहे. २० वर्षांपासून वेतनवाढीचा प्रश्न प्रलंबित दुय्यम न्यायालयांमधील कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा प्रश्न गेल्या २० वर्षांपासून प्रलंबित असल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. इतर शासकीय विभागांतील कर्मचाऱ्यांच्या तुलनेत न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे वेतन आणि सेवा सुविधांमध्ये तफावत असल्याचा दावा करण्यात येत आहे. या प्रश्नावर वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप ठोस निर्णय झालेला नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी आहे. कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, ३१ जानेवारी २०२५ रोजी उच्च न्यायालयाने दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीसंदर्भातील प्रस्ताव विधी व न्याय विभागामार्फत राज्य शासनाकडे सादर केला होता. मात्र, त्यानंतरही शासनस्तरावर निर्णय झालेला नसल्याने कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. टप्प्याटप्प्याने आंदोलन तीव्र महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या नेतृत्वाखाली वेतनवाढीच्या मागणीसाठी टप्प्याटप्प्याने आंदोलन करण्यात येत आहे. यापूर्वी १६ सप्टेंबर रोजी कर्मचाऱ्यांनी काळी फीत लावून निषेध व्यक्त केला होता. त्यानंतर आंदोलनाच्या दुसऱ्या टप्प्यात १६ आणि १७ ऑक्टोबर रोजी भडगाव न्यायालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून दैनंदिन कामकाज सुरू ठेवले. या मूक आंदोलनातून कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. वेतनवाढ आणि सेवा सुविधांबाबत निर्णय घेण्यास आणखी विलंब करू नये, अशी त्यांची भूमिका आहे.

राज्यभरात अन्नधान्य वितरण व्यवस्था ठप्प!

ई-पॉस मशीनच्या सॉफ्टवेअर अपडेटमुळे तांत्रिक बिघाड; ५२ हजार ६८९ स्वस्त धान्य दुकानांतील वितरण विस्कळीत

जन सम्राट टाईम्स

भुसावळ । प्रतिनिधी : राज्यभरात दुष्काळाचे सावट असताना आणि दसरा-दिवाळीसारखे सण तोंडावर आलेले असताना सार्वजनिक अन्नधान्य वितरण व्यवस्थेला तांत्रिक बिघाडाचा फटका बसला आहे. ई-पॉस मशीनच्या सॉफ्टवेअर अपडेटनंतर वितरण प्रणाली विस्कळीत झाल्याने राज्यातील स्वस्त धान्य दुकानांमधून धान्यवाटप रखडल्याचे चित्र आहे. दुकानांमध्ये धान्यसाठा उपलब्ध असतानाही मशीन व्यवस्थित चालत नसल्यामुळे कार्डधारकांना रिकाम्या हाताने परतावे लागत असल्याच्या तक्रारी आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, राज्यातील ५२ हजार ६८९ स्वस्त धान्य दुकानांमधील वितरण प्रक्रियेवर या तांत्रिक समस्येचा परिणाम झाला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून वितरणात अडथळे येत असल्याने रेशनधारकांची गैरसोय वाढली आहे.

विशेषतः रोजंदारीवर काम करणारे मजूर, आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबे आणि शासकीय अन्नधान्य योजनेवर अवलंबून असलेल्या नागरिकांना याचा फटका बसत आहे. धान्य दुकानात, पण वितरणाला तांत्रिक अडथळा



शासनाकडून दर महिन्याचे धान्य वेळेत उपलब्ध करून देऊन महिन्याच्या सुरुवातीपासून किंवा पहिल्या आठवड्यात वितरण सुरू करण्याचे धोरण राबवले जाते. तालुका स्तरावरूनही पहिल्या पंधरवड्यात धान्यवाटप पूर्ण करण्यासाठी दुकानदारांकडे पाठपुरावा केला जातो. त्यामुळे कार्डधारक महिन्याच्या सुरुवातीपासूनच धान्य घेण्यासाठी दुकानांमध्ये येत आहेत. मात्र, ई-पॉस मशीनचे सॉफ्टवेअर अपडेट केल्यानंतर मशीन सुरळीत चालत नसल्याने वितरण प्रक्रिया अडचणीत आली आहे. अनेक ठिकाणी मशीनमध्ये उपलब्ध धान्यसाठ्याची माहिती दिसत नसल्यामुळे दुकानदारांना व्यवहार पूर्ण करता येत नसल्याचे सांगितले जात आहे. परिणामी, दुकानांमध्ये गहू आणि तांदूळ उपलब्ध असूनही लाभार्थ्यांना धान्य मिळण्यात विलंब होत आहे. रोजंदारी सोडून रेशन दुकानांवर फेऱ्या धान्य आले असल्याची माहिती मिळाल्याने अनेक गरीब नागरिक रोज सकाळी रेशन दुकानांसमोर रांगा लावत आहेत. रोजंदारीवर काम करणाऱ्या मजुरांना धान्य मिळवण्यासाठी काम सोडून दुकानात जावे लागत आहे. मात्र, तांत्रिक अडचणीमुळे धान्य न मिळाल्याने त्यांचा वेळ आणि रोजचे उत्पन्न दोन्ही वाया जात असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. काही ठिकाणी कार्डधारक आणि दुकानदार यांच्यात वाद होण्याचे प्रकारही घडत असल्याचे सांगण्यात येते. कार्डधारकांनी धान्य देण्याची मागणी केली, तर दुकानदारांकडून ई-पॉस मशीनवर व्यवहार पूर्ण होऊन पावती निघाल्याशिवाय नियमानुसार धान्य देता येत नसल्याचे स्पष्ट केले जात आहे. त्यामुळे तांत्रिक बिघाडाचा फटका थेट लाभार्थ्यांना बसत आहे. खासगी कंपनीच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह ई-पॉस मशीन आणि वितरण प्रणालीशी संबंधित कामकाज खासगी कंपनीकडे सोपवण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

तलवार घेऊन फिरणारा तरुण पोलिसांच्या ताब्यात

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद | प्रतिनिधी : नशिराबाद शहरातील ताजनगर परिसरात उघडी तलवार हातात घेऊन फिरत दहशत निर्माण केल्याच्या आरोपावरून नशिराबाद पोलिसांनी एका तरुणाला तलवारीसह ताब्यात घेतले आहे. शेख अल्ताफ शेख रऊफ (वय २८, रा. ख्वाजा गरीब नगर, नशिराबाद, ता. जि. जळगाव) असे ताब्यात घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. त्याच्याकडून सुमारे ३३ इंच लांबीची लोखंडी तलवार जप्त करण्यात आली असून, त्याच्याविरुद्ध भारतीय शस्त्र अधिनियमाच्या कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवार, १६ ऑक्टोबर रोजी नशिराबाद पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक योगिता एम. नारखेडे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, ताजनगर परिसरात एक व्यक्ती उघडी तलवार हातात घेऊन फिरत आहे. या माहितीच्या आधारे नारखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या पथकाने पंचांच्या उपस्थितीत संबंधित परिसरात सापळा रचला. दरम्यान, माहितीतील वर्णनाशी जुळणारा एक तरुण हातात उघडी तलवार घेऊन फिरताना पोलिसांना दिसला. पथकाने तत्काळ कारवाई करत त्याला जागीच ताब्यात घेतले. पंचांसमक्ष केलेल्या तपासणीत त्याच्याकडे तलवार आढळून आली.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अभिवादन

आमदार सुहास कांदे यांची उपस्थिती; दुष्काळ, पाणीटंचाई प्रश्नांवर चर्चा

जन सम्राट टाईम्स

नांदगाव । प्रतिनिधी: भारताचे माजी राष्ट्रपती आणि 'मिसाईल मॅन' म्हणून ओळखले जाणारे डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. नांदगावचे आमदार सुहास आण्णा कांदे यांनीही प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी डॉ. कलाम यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. "डॉ. कलाम हे युवकांचे प्रेरणास्थान होते. त्यांचे विचार आजही देशाला दिशा देणारे आहेत," असे प्रतिपादन त्यांनी केले. नांदगावच्या दुष्काळी परिस्थितीचा प्रश्न ऐरणीवर अभिवादन कार्यक्रमानंतर आमदार सुहास कांदे यांनी नांदगाव मतदारसंघातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांकडे उपमुख्यमंत्री शिंदे यांचे लक्ष वेधले. पावसाअभावी तालुक्यात निर्माण झालेली पाणीटंचाई, पिकांचे नुकसान आणि जनावरांसाठी चाऱ्याची कमतरता या विषयांवर यावेळी सविस्तर चर्चा झाली. दुष्काळी परिस्थितीमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीने दिलासा मिळावा, यासाठी आमदार कांदे यांनी पाणीपुरवठ्यासाठी टँकर सुरू करणे, चारा छावण्या उभारणे



आणि बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची मागणी केली. या मागण्यांवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे नांदगाव तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीवर शासनाकडून कोणत्या उपाययोजना केल्या जातात, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. मान्यवरांची उपस्थिती या कार्यक्रमाला शिवसेनेचे सचिव भाऊसाहेब चौधरी, संजय मोरे, माजी खासदार आनंद परांजपे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. भारताचे माजी राष्ट्रपती आणि 'मिसाईल मॅन' म्हणून ओळखले जाणारे डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. नांदगावचे आमदार सुहास आण्णा कांदे यांनीही प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. शिंदे यांनी डॉ. कलाम यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. "डॉ. कलाम हे युवकांचे प्रेरणास्थान होते. नांदगावच्या दुष्काळी परिस्थितीचा प्रश्न ऐरणीवर अभिवादन कार्यक्रमानंतर आमदार सुहास कांदे यांनी नांदगाव मतदारसंघातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांकडे उपमुख्यमंत्री शिंदे यांचे लक्ष वेधले.

गोदावरीच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय नवोपक्रम प्रदर्शनात बाजी!

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी : शेतीमालाचे नुकसान रोखण्यासाठी आणि शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी साकारलेल्या नाविन्यपूर्ण प्रकल्पाने राष्ट्रीय स्तरावरील नवोपक्रम प्रदर्शनात यश संपादन केले आहे. सौरऊर्जेवर चालणाऱ्या 'मिनी कोल्ड स्टोरेज फॉर फ्रेश व्हेजिटेबल्स' या प्रकल्पासाठी विद्यार्थ्यांनी पुरस्कार पटकावला. या कामगिरीमुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. जळगाव येथे १६ ऑक्टोबर रोजी 'सेवा संकल्प अभियान २०२६' अंतर्गत आयोजित 'नॅशनल इनोव्हेशन एक्स्पो 2K26' मध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या प्रकल्पाचे सादरीकरण केले. सरदार वल्लभभाई पटेल भवन येथे झालेल्या या प्रदर्शनात विविध क्षेत्रांतील नाविन्यपूर्ण कल्पना आणि तंत्रज्ञानाधारित उपायांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले.शेतकऱ्यांच्या समस्येवर सौरऊर्जेचा पर्याय भाजीपाला काढणीनंतर योग्य साठवणुकीअभावी त्याची गुणवत्ता घसरणे आणि मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, ही शेती क्षेत्रातील महत्त्वाची समस्या आहे. या समस्येवर उपाय शोधण्याच्या उद्देशाने विद्यार्थ्यांनी सौरऊर्जेवर चालणाऱ्या लघु शीतगृहाची संकल्पना विकसित केली. या प्रकल्पाच्या माध्यमातून ताज्या भाज्यांची साठवणूक करून त्यांची गुणवत्ता टिकवण्यास मदत होऊ शकते. तसेच, शेतीमालाचे नुकसान कमी करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम उपयुक्त ठरू शकतो. सौरऊर्जेचा वापर केल्यामुळे पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्याचाही प्रयत्न या प्रकल्पातून करण्यात आला आहे. सहा विद्यार्थ्यांच्या संघाची उल्लेखनीय कामगिरी गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन अभियांत्रिकी विभागातील केतन गिरासे, अमृता रोडिये, आरती साळुंके, प्रशिक तायडे, वेदांत काकड आणि शेख इतिसाम या सहा विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे हा प्रकल्प सादर केला.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

संजय गांधी निराधार, श्रावणबाळ योजनेतील जाचक अटी शिथिल!

जन सम्राट टाईम्स



भुसावळ। प्रतिनिधी : संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेतील लाभार्थ्यांना दिलासा देणारा निर्णय महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने घेतला आहे. २७ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयातील कागदपत्रांसंबंधीच्या अटींमध्ये सुधारणा करून १४ ऑक्टोबर २०२६ रोजी सुधारित शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. या निर्णयामुळे आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसल्याने अडचणींचा सामना करणाऱ्या गरीब, अशिक्षित, वृद्ध आणि निराधार लाभार्थ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेचे भुसावळ तालुकाध्यक्ष संघरत्न सपकाळे यांनी या प्रश्नावर केलेल्या पाठपुराव्याला यश आल्याचा दावा करण्यात आला आहे. वयाच्या पुराव्यासाठी आधार कार्डाचा पर्याय २७ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार, लाभार्थ्यांच्या वयाच्या पुराव्यासाठी जन्माचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे अनिवार्य करण्यात आले होते. मात्र, ग्रामीण भागातील अनेक वृद्ध व्यक्ती शिक्षणापासून वंचित राहिलेल्या असल्याने त्यांच्याकडे शाळेचा दाखला किंवा जन्मनोंदणीचे दस्तऐवज उपलब्ध नसतात. परिणामी, पात्र असूनही अनेकांना सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळविताना अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर सुधारित शासन निर्णयानुसार वयाच्या पुराव्यासाठी लाभार्थ्याचे आधार कार्ड ग्राह्य धरण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच उत्पन्नाच्या प्रमाणपत्राऐवजी दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र किंवा केंद्र पुरस्कृत योजनेशी संबंधित पॅन कार्डाचा 26AS नमुना यांपैकी एक पर्याय स्वीकारण्याची तरतूद करण्यात आल्याचे दिलेल्या माहितीत नमूद आहे. २२ सप्टेंबरच्या निवेदनातून प्रश्नाला वाचा लाभार्थ्यांना भेडसावणाऱ्या या अडचणी लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेचे भुसावळ तालुकाध्यक्ष संघरत्न सपकाळे यांनी २२ सप्टेंबर २०२६ रोजी राज्याच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे यांना लेखी निवेदन दिले होते. जन्माचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला उपलब्ध नसल्यामुळे पात्र वृद्ध आणि निराधार व्यक्तींना योजनांच्या लाभापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी पर्यायी कागदपत्रे स्वीकारण्याची मागणी त्यांनी केली होती. शासनाने संबंधित अटींमध्ये सुधारणा केल्याने या पाठपुराव्याला यश आल्याचे सपकाळे यांनी म्हटले आहे.पात्र लाभार्थ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना या आर्थिकदृष्ट्या दुर्बल, निराधार आणि वृद्ध व्यक्तींना सामाजिक सुरक्षा देणाऱ्या महत्त्वाच्या योजना आहेत. कागदपत्रांच्या अभावामुळे पात्र लाभार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी पर्यायी पुराव्यांची तरतूद महत्त्वाची मानली जात आहे. सुधारित निर्णयामुळे ग्रामीण भागातील अशिक्षित वृद्ध, निराधार व्यक्ती आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल लाभार्थ्यांना अर्ज प्रक्रिया सुलभ होण्यास मदत होईल.

धडगावच्या वनगावांतील अतिक्रमित शेतकऱ्यांना दुष्काळी भरपाई द्या!

वनपट्टे प्रलंबित असलेल्या शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान

जन सम्राट टाईम्स

धडगाव । प्रतिनिधी : धडगाव तालुक्यातील वनजमिनींवर वर्षानुवर्षे शेती करणाऱ्या, मात्र अद्याप वनहक्क पट्टे न मिळालेल्या शेतकऱ्यांनाही दुष्काळी मदत आणि पीक नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यंदाच्या दुष्काळामुळे या शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, आर्थिक संकटात सापडलेल्या वनशेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्याची मागणी करण्यात येत आहे. धडगाव तालुक्यात एकूण ७३ वनगावे आहेत. या गावांतील काही शेतकऱ्यांना वनहक्क कायद्यांतर्गत वनपट्टे मिळाले आहेत; परंतु अनेक शेतकऱ्यांचे वनपट्टे अद्याप प्रलंबित आहेत. वनपट्टे मिळाले नसले, तरी हे शेतकरी अनेक वर्षांपासून संबंधित जमिनींवर प्रत्यक्ष शेती करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. चालू हंगामात शेतकऱ्यांनी कर्ज काढून बी-बियाणे, खते आणि शेतीच्या मशागतीवर खर्च केला होता. मात्र, पावसाअभावी आणि दुष्काळी



परिस्थितीमुळे पिके करपून गेली आहेत. त्यामुळे उत्पादनाची आशा मावळली असून, घेतलेले कर्ज कसे फेडायचे, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे.वन विभाग आणि महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे बाधित गावांची पाहणी करावी. प्रत्यक्ष पीकपेरा, शेतीचे क्षेत्र आणि नुकसानीची स्थिती तपासून योग्य ती कार्यवाही करावी.
तसेच लागू असलेल्या शासकीय निकषांनुसार पात्र शेतकऱ्यांना पीक नुकसानभरपाई व दुष्काळी मदत मंजूर करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. तालुक्यातील अनेक गावांना दुष्काळाचा फटका धडगाव तालुक्यातील सावऱ्यादिगर, भमाणा, उडद्या, खापरमाळ, भाबरी, सादरी, लेखडा, भरड, थुवानी, अट्टी, बोरसीसा, दुठ्ठल, चिचखेडी, डोमखेडी, निमगव्हाण, सुरुंग, तिनिसमाळ, कुकतार, आकवाणी, कुंभरी, नलगव्हाण, गोराडी, शेलगदा, पीपलचोप, केली, शिक्का, गेंदा, माळ, बिलगाव, चिखली, बोरी, खर्डी खुर्द, निमखेडी, खुटवडा, शेलदा, बेडीपाडा, खडकला खुर्द, खडकला बुद्रुक, मांडवी बुद्रुक, मांडवी खुर्द, टेभुर्णी, बोदला, वावी, राजबर्डी, शेलकुवी, शिंदवाणी, कुकलट, तेलखेडी, कात्रा, निगदी, त्रिशूल, कुवरखेत, वेलखेडी, वलवाल, घाटली, धावलघाट, कामोद वसाहत, काकडदा, खांबला, सिरसाणी, बिजरी, काकारपाटी, उखळीआंबा, चाँदसैली, झुम्मट, मकतारझिरा, मोजरा, वाहवाणी, पौला, सिंधीदिगर, कुंड्या आणि फलई आदी गावांतील शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

जळगाव शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कर्मचाऱ्यांचे बेमुदत धरणे!

बहुजन कर्मचारी संघाच्या आरोग्य शाखेचे आंदोलन १२ ऑक्टोबरपासून सुरू

जन सम्राट टाईम्स



जळगाव। (प्रतिनिधी): शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथे राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाच्या आरोग्य शाखेच्या वतीने १२ ऑक्टोबरपासून बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. कंत्राटी पद्धतीने होणारी भरती रद्द करून सरळसेवेने पदभरती करावी, पदोन्नती द्यावी, नर्सिंग भत्ता लागू करावा यांसह विविध मागण्यांसाठी कर्मचारी आंदोलनात सहभागी झाले आहेत. राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाच्या म्हणण्यानुसार, महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील सामान्य रुग्णालयांमध्ये कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातही कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांसाठी धरणे धरले आहे. सात प्रमुख मागण्यांसाठी आंदोलन या आंदोलनाद्वारे संघटनेने सात प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये कंत्राटी पद्धतीने होणारी भरती रद्द करून तातडीने सरळसेवेने पदभरती करावी, पदभरतीतील ८०:२० ची अन्यायकारक अट रद्द करावी आणि सर्व पात्र कर्मचाऱ्यांना तातडीने पदोन्नती द्यावी, या मागण्यांचा समावेश आहे. तसेच सीएनई (CNE) रजिस्ट्रेशनची सक्तीची अट रद्द करावी, परिचारिका संवर्गातील कर्मचाऱ्यांना दरमहा ९ हजार रुपयांचा नर्सिंग भत्ता लागू करावा, परिचर्या संवर्गातील सर्व पदनामे केंद्र सरकारच्या धर्तीवर सुधारित करून अद्ययावत करावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय राज्यस्तरीय सेवाज्येष्ठता यादी तयार करून सेवाज्येष्ठ कर्मचाऱ्यांना पदभरती व पदोन्नतीच्या प्रक्रियेत प्रथम संधी द्यावी, अशीही संघटनेची मागणी आहे. शीला पटोकार, दीपक बोरसे यांचे नेतृत्व या आंदोलनाचे नेतृत्व राष्ट्रीय मूलनिवासी संघाच्या जळगाव जिल्हाध्यक्ष शीला पटोकार आणि राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाचे जळगाव जिल्हा सचिव दीपक बोरसे यांनी केले. आंदोलनात रोहित कोळी, महेश्वर घुलेश्वर, कल्पना बच्छाव, जयश्री वानखेडे, निकिता गवई, आंचल शेख, संकिता जाधव, मोनाली कदम, केतकी कुंभार, विशाल सोळंकी, शिवराज गायकवाड, अनिल वळवी, सुरज अहिरराव, सोमेश निकम, अनिल भोई, धीरज मुंढे, परवेज शेख, तेजस्विनी जाधव, गणेश वायाळ आणि सौरभ शिंदे यांनी सहभाग नोंदवला. विविध संघटनांचा आंदोलनाला पाठिंबा या आंदोलनाला विविध सामाजिक व संघटनात्मक पदाधिकाऱ्यांनी पाठिंबा दिला. सुमित्र अहिरे (राज्य प्रभारी, आंदोलन निर्माण समिती), दिलीप जाधव, रविंद्र मोरे (तालुकाध्यक्ष, भारत मुक्ती मोर्चा) आणि कैलास मसाने यांनी आंदोलनाला सक्रिय पाठिंबा दर्शविला.

वाढदिवसानिमित्त शौनक लिमकरकडून सारोळा शाळेला ताशाची भेट!

जन सम्राट टाईम्स

जामखेड। प्रतिनिधी: वाढदिवसाचा आनंद सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्याचा प्रेरणादायी उपक्रम सारोळा येथे पाहायला मिळाला. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सारोळा येथील इयत्ता पहिलीतील विद्यार्थी चि. शौनक राहुल लिमकर याच्या वाढदिवसानिमित्त त्याच्या कुटुंबीयांनी शाळेला १,५०० रुपये किमतीचा ताशा भेट दिला. 'मिशन आपुलकी' उपक्रमांतर्गत दिलेल्या या भेटीमुळे शाळेच्या शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांना हातभार लागणार आहे. शाळेच्या गरजा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरेल अशी वस्तू भेट देण्याचा निर्णय लिमकर कुटुंबीयांनी घेतला. वाढदिवसासारखा वैयक्तिक आनंदाचा प्रसंग शाळेच्या उपयोगासाठी समर्पित करून त्यांनी सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. या योगदानाबद्दल शाळेच्या वतीने राहुल बब्रुवान लिमकर यांचा सन्मान करण्यात आला. 'मिशन आपुलकी'तून शाळेच्या विकासाला हातभार विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, सांस्कृतिक



आणि व्यक्तिमत्त्व विकास घडविण्यात शाळेची भूमिका महत्त्वाची असते. मात्र, शाळेच्या प्रगतीसाठी शिक्षकांसोबतच पालक आणि समाजाचे सहकार्यही तितकेच आवश्यक आहे. ही जाणीव ठेवून लिमकर कुटुंबीयांनी दिलेली ताशाची भेट इतरांसाठीही प्रेरणादायी ठरणारी आहे. वाढदिवस साजरा करताना केवळ वैयक्तिक उत्सवावर खर्च करण्याऐवजी शाळेला उपयुक्त वस्तू भेट देण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे. अशा छोट्या-छोट्या योगदानातून शाळेच्या गरजा पूर्ण करण्यास मदत होते, तसेच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव आणि सहकार्याची भावना रुजण्यास हातभार लागतो. शाळेच्या वतीने आभार; शौनकला शुभेच्छा या स्तुत्य उपक्रमाबद्दल शाळेच्या वतीने लिमकर कुटुंबीयांचे आभार व्यक्त करण्यात आले. तसेच चि. शौनक लिमकर याला वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी ग्रेड मुख्याध्यापक संदीप भालसिंग, पदवीधर शिक्षक सुरेश बर्वे, राहुल लिमकर, अर्चना त्रिमुखे, उपाध्यापक प्रशांत होळकर, उपाध्यापिका शबाना शेख, वृषाली खांदवे, अमृता रसाळ यांच्यासह शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते. वाढदिवसाचा आनंद सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्याचा प्रेरणादायी उपक्रम सारोळा येथे पाहायला मिळाला. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सारोळा येथील इयत्ता पहिलीतील विद्यार्थी चि. शौनक राहुल लिमकर याच्या वाढदिवसानिमित्त कुटुंबीयांनी शाळेला १,५०० रुपये किमतीचा ताशा भेट दिला. 'मिशन आपुलकी' उपक्रमांतर्गत दिलेल्या या भेटीमुळे शाळेच्या शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांना हातभार लागणार आहे.

सारोळा शाळेत डॉ. कलाम जयंतीसह चार उपक्रम उत्साहात साजरे!

वाचनसंस्कृती, स्वच्छता आणि दिव्यांगांविषयी संवेदनशीलतेचा विद्यार्थ्यांना संदेश

जन सम्राट टाईम्स

जामखेड। प्रतिनिधी: तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सारोळा, केंद्र राजुरी येथे गुरुवार, १५ ऑक्टोबर २०२६ रोजी भारताचे माजी राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ आणि 'मिसाईल मॅन' डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती, वाचन प्रेरणा दिन, जागतिक हात धुवा दिन आणि जागतिक सफेद काठी दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरे करण्यात आले.
या चारही उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड, स्वच्छतेच्या सवयी, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि दिव्यांग व्यक्तींविषयी आदरभाव निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. डॉ. कलाम यांच्या जीवनप्रवासातून प्रेरणा डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना डॉ. कलाम यांचे बालपण, शैक्षणिक प्रवास, वैज्ञानिक क्षेत्रातील योगदान, त्यांना मिळालेले पुरस्कार आणि त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांविषयी माहिती दिली.
त्यांच्या संघर्षमय आणि प्रेरणादायी जीवनप्रवासातून विद्यार्थ्यांनी जिद्द, मेहनत, शिस्त आणि मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा घेतली. वाचन प्रेरणा दिनानिमित्त वाचनाचे महत्त्व, 'कुसुमाग्रज वाचन अभियान' आणि 'रीडिंग बेल'



या उपक्रमांविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी निर्माण व्हावी आणि शालेय जीवनात वाचनसंस्कृती रुजावी, या उद्देशाने शिक्षक व विद्यार्थ्यांनी सामूहिकरीत्या पुस्तकांचे वाचन केले.
वाचनातून ज्ञानवृद्धी, विचारशक्ती आणि व्यक्तिमत्त्व विकास साधता येतो, हा संदेशही यावेळी देण्यात आला. हात धुण्याच्या प्रात्यक्षिकातून स्वच्छतेचा संदेश जागतिक हात धुवा दिनानिमित्त विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व आणि संसर्गजन्य आजारांपासून बचाव करण्यासाठी हात योग्य पद्धतीने धुण्याची आवश्यकता समजावून सांगण्यात आली. हात स्वच्छ ठेवल्याने अनेक आजारांचा प्रसार रोखण्यास मदत होते, याविषयी जनजागृती करण्यात आली.
विद्यार्थ्यांनी हात धुण्याचे प्रात्यक्षिक सादर करून स्वच्छतेचा संदेश दिला. सफेद काठी दिनानिमित्त संवेदनशीलतेची जाणीव जागतिक सफेद काठी दिनानिमित्त दृष्टीदोष असलेल्या व्यक्तींच्या स्वावलंबनाचे आणि सुरक्षितपणे मार्गक्रमण करण्याच्या साधनाचे प्रतीक असलेल्या पांढऱ्या काठीचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. दृष्टीहीन व्यक्तींना दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडचणी, त्यांना आवश्यक असणारे सहकार्य आणि त्यांच्याशी आदराने व संवेदनशीलतेने वागण्याचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव आणि सहकार्याची भावना विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. शिक्षक व विद्यार्थ्यांचा सहभाग या उपक्रमांना शाळेचे ग्रेड मुख्याध्यापक संदीप भालसिंग, पदवीधर शिक्षक सुरेश बर्वे, राहुल लिमकर, अर्चना त्रिमुखे, उपाध्यापक प्रशांत होळकर, उपाध्यापिका शबाना शेख, वृषाली खांदवे, अमृता रसाळ तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित होते. ज्ञान, विज्ञान, वाचन, स्वच्छता आणि सामाजिक संवेदनशीलता या मूल्यांची रुजवण करणारे हे उपक्रम उत्साहात पार पडले.

भवरखेडेत गुरे चोरांचा डाव फसला; दोन गाईंची सुटका!

जन सम्राट टाईम्स

धरणगाव। प्रतिनिधी: धरणगाव तालुक्यातील भवरखेडे येथे गुरे चोरीचा प्रयत्न झाल्याची घटना १६ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री अडीच ते तीन वाजेच्या सुमारास उघडकीस आली. शेतकरी लोटन हिरमल पाटील यांच्या दोन गाई बोलेरो गाडीत टाकून चोरण्याचा प्रयत्न अज्ञात चोरट्यांनी केला. मात्र, गावकऱ्यांच्या सतर्कतेमुळे चोरट्यांचा डाव फसला.
चोरटे बोलेरो गाडी घटनास्थळीच सोडून पसार झाले. या घटनेत दोन्ही गाईची सुटका झाल्याने शेतकऱ्याचे संभाव्य मोठे नुकसान टळले. मध्यरात्री गाई चोरण्याचा प्रयत्न मिळालेल्या माहितीनुसार, भवरखेडे येथे मध्यरात्री अडीच ते तीनच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी गुरे चोरीचा प्रयत्न केला. त्यांनी लोटन हिरमल पाटील यांच्या दोन गाई बोलेरो गाडीत भरल्या. मात्र, गावकऱ्यांची सतर्कता आणि परिस्थितीमुळे चोरट्यांना आपला डाव पूर्ण करता आला नाही. त्यामुळे त्यांनी गाडी घटनास्थळी सोडून पळ काढला. गाडीत टाकलेल्या दोन्ही गाईंची सुटका करण्यात आली. मात्र, गावात मध्यरात्री घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली असून, शेतकरी आणि पशुपालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. पशुधनाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर ग्रामीण भागात अनेक शेतकरी शेतीसोबत पशुपालनावरही अवलंबून असतात. अशा परिस्थितीत जनावरांच्या चोरीचा प्रयत्न झाल्याने पशुधनाच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. शेतकऱ्यांनी जनावरांच्या सुरक्षेसाठी सतर्क राहण्याची गरज व्यक्त होत आहे. धरणगाव पोलिसांत गुन्हा दाखल या प्रकरणी शेतकरी लोटन हिरमल पाटील यांच्या फिर्यादीवरून धरणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वनराई बंधाऱ्यासाठी श्रमदान; कुंडलमध्ये जलसंधारणाचा आदर्श!

महिला शेतकरी गटाचा पुढाकार; पाणी फाउंडेशनच्या मार्गदर्शनाखाली नाला खोलीकरण आणि बंधाऱ्याची उभारणी

जन सम्राट टाईम्स

धडगाव । प्रतिनिधी: पाण्याचे महत्त्व ओळखून जलसंधारणासाठी लोकसहभागातून प्रयत्न केले, तर गावाच्या पाणीटंचाईवर मात करण्याचा मार्ग सुकर होऊ शकतो, याचा प्रत्यय धडगाव तालुक्यातील कुंडल येथे आला. प्रांजल महिला शेतकरी गटाच्या पुढाकाराने आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने १६ ऑक्टोबर २०२६ रोजी श्रमदानातून नाला खोलीकरण व वनराई बंधाऱ्याची उभारणी करण्यात आली. पाणी फाउंडेशनच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून महिलांनी जलसंधारणाच्या कामात सक्रिय सहभाग नोंदवत गावासमोर एक आदर्श निर्माण केला. महिला, शेतकरी आणि तरुणांचा उत्स्फूर्त सहभाग कुंडल येथे सकाळपासूनच महिला शेतकरी, पुरुष शेतकरी आणि तरुणांनी श्रमदानासाठी एकत्र येत जलसंधारणाच्या कामाला सुरुवात केली. नाल्यातील गाळ काढणे, दगड-माती गोळा करणे आणि पोत्यांची रचना करून वनराई बंधारा उभारणे, अशी कामे ग्रामस्थांनी स्वखर्चाने आणि स्वतःच्या श्रमातून पूर्ण केली. पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीत मुरविण्यासाठी वनराई बंधारे महत्त्वपूर्ण ठरतात. याच उद्देशाने ग्रामस्थांनी एकजुटीने काम करत नाला खोलीकरण आणि बंधारा निर्मितीचा उपक्रम राबविला. गावातील महिलांनी दाखविलेली कार्यतत्परता आणि सामूहिक सहभाग यामुळे परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले.



पाणी फाउंडेशनसह विविध यंत्रणांचे मार्गदर्शन या उपक्रमाला पाणी फाउंडेशनचे गोपाल सर आणि स्वप्नील सर, कृषी मेंटर योगेश खर्डे, उमेद अभियानाचे मेंटर बळीराम पावरा, बीएमएमयूचे नाना पावरा आणि बीएमएफवायचे अशोक साळवे यांनी भेट दिली. यावेळी उपस्थितांनी ग्रामस्थांना 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या संकल्पनेचे महत्त्व समजावून सांगितले. जलसंधारणाच्या विविध उपाययोजना, पावसाच्या पाण्याचा प्रभावी वापर आणि भूजल पुनर्भरणासाठी लोकसहभागाची आवश्यकता याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. जलसंधारणातून शेतीला दिलासा मिळण्याची अपेक्षा वनराई बंधाऱ्यामुळे पावसाचे पाणी काही काळ अडवून ते जमिनीत मुरण्यास मदत होईल. परिणामी, परिसरातील विहिरी आणि बोअरवेलच्या भूजल पातळीत सुधारणा होण्यास हातभार लागू शकतो. याचा लाभ शेतीसह पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेसाठीही होईल, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली. पाणीटंचाई आणि अनिश्चित पावसाच्या पार्श्वभूमीवर कुंडल येथील महिलांनी पुढाकार घेऊन राबविलेला हा उपक्रम लोकसहभागातून जलसंधारणाचे काम उभे करण्याचा प्रेरणादायी प्रयत्न ठरला आहे. महिलांची संघटनशक्ती, ग्रामस्थांचे श्रमदान आणि विविध यंत्रणांचे मार्गदर्शन यांच्या समन्वयातून गावाच्या जलसमृद्धीकडे एक महत्त्वाचे पाऊल टाकण्यात आले. 'महिलांची एकजूट संपूर्ण तालुक्यासाठी प्रेरणादायी' सरपंच मंगलाताई योगेश पाडवी कुंडल गावच्या सरपंचांनी या श्रमदानात स्वतः सहभागी होत महिला गटाच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली. "प्रांजल महिला शेतकरी गटाने दाखवलेले हे संघटन आणि कष्ट संपूर्ण धडगाव तालुक्यासाठी अत्यंत प्रेरणादायी आहेत. या वनराई बंधाऱ्यामुळे पावसाचे पाणी वाहून न जाता अडून राहील आणि परिसरातील भूजल पातळी वाढण्यास मोठी मदत होईल," असा विश्वास सरपंचांनी व्यक्त केला. या वनराई बंधाऱ्यामुळे गावातील शेतीसाठी आणि पिण्याच्या पाण्यासाठी मोठा दिलासा मिळणार आहे. पावसाचे पाणी साचून राहिल्याने ते शेतात व जमिनीत मुरेल, ज्यामुळे परिसरातील विहिरी व बोअरवेलची पाणी पातळी वाढेल, असा विश्वास गावकऱ्यांनी व्यक्त केला. पाण्याचे महत्त्व ओळखून जलसंधारणासाठी लोकसहभागातून प्रयत्न केले, तर गावाच्या पाणीटंचाईवर मात करण्याचा मार्ग सुकर होऊ शकतो, याचा प्रत्यय धडगाव तालुक्यातील कुंडल येथे आला. प्रांजल महिला शेतकरी गटाच्या पुढाकाराने आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने १६ ऑक्टोबर २०२६ रोजी श्रमदानातून नाला खोलीकरण व वनराई बंधाऱ्याची उभारणी करण्यात आली. पाणी फाउंडेशनच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून महिलांनी जलसंधारणाच्या कामात सक्रिय सहभाग नोंदवत गावासमोर एक आदर्श निर्माण केला. महिला, शेतकरी आणि तरुणांचा उत्स्फूर्त सहभाग कुंडल येथे सकाळपासूनच महिला शेतकरी, पुरुष शेतकरी आणि तरुणांनी श्रमदानासाठी एकत्र येत जलसंधारणाच्या कामाला सुरुवात केली. नाल्यातील गाळ काढणे, दगड-माती गोळा करणे आणि पोत्यांची रचना करून वनराई बंधारा उभारणे, अशी कामे ग्रामस्थांनी स्वखर्चाने आणि स्वतःच्या श्रमातून पूर्ण केली. पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीत मुरविण्यासाठी वनराई बंधारे महत्त्वपूर्ण ठरतात.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

धरणगाव तालुक्यातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी सरसकट माफ करा!



जन सम्राट टाईम्स

धरणगाव । प्रतिनिधी : धरणगाव तालुक्यात सलग दोन वर्षांपासून पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली आहे. या पार्श्वभूमीवर शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये तालुक्यातील पात्र विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफ करून त्यांना शिक्षणासाठी दिलासा द्यावा, अशी मागणी सहारा बहुद्देशीय संस्था, धरणगाव यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगाव येथे निवेदन सादर करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मण विठोबा माळी, उपाध्यक्ष विनोद सुरेश रोकडे आणि सचिव रमेश जानकीराम चव्हाण यांच्यासह डॉ. गणेश माळी, रणजित सिकरवार, पवन माळी, विजय चव्हाण, दीपक बाविस्कर, सुबोध खैरनार आणि निखिल साळुंखे यांच्या उपस्थितीत महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. सौ. आर. पी. चौधरी आणि लिपिक परेश जाधव यांच्याकडे हे निवेदन देण्यात आले. दुष्काळामुळे पालकांसमोर शिक्षणाचा खर्च पेलण्याचे आव्हान निवेदनात नमूद केल्यानुसार, धरणगाव तालुक्यातील शेतकरी कुटुंबांना कमी पावसामुळे शेतीच्या उत्पन्नात घट आणि आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक पालकांचे उत्पन्न कमी झाल्याने विद्यार्थ्यांची महाविद्यालयीन फी भरणे कठीण झाले आहे. परिणामी, आर्थिक परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण अर्धवट राहण्याची भीती निर्माण झाली आहे. शिक्षण हा प्रत्येक विद्यार्थ्याच्या उज्ज्वल भवितव्याचा पाया आहे. मात्र, आर्थिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागणे ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त परिस्थितीचा विचार करून विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कात सवलत देण्याची आवश्यकता असल्याचे संस्थेने निवेदनात म्हटले आहे. महाराष्ट्र शासनाने संकटग्रस्त आणि दुष्काळग्रस्त क्षेत्रांतील विद्यार्थ्यांसाठी जाहीर केलेल्या तरतुदींनुसार पात्र विद्यार्थ्यांना शैक्षणिक फी माफीचा लाभ देण्यात यावा, अशी मागणी संस्थेने केली आहे. धरणगाव तालुक्यातील पात्र विद्यार्थ्यांना संबंधित शासन निर्णयानुसार लाभ मिळावा आणि फी माफीच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या पालकांना शैक्षणिक खर्चाचा अतिरिक्त भार सहन करावा लागू नये, तसेच कोणताही विद्यार्थी केवळ आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून दूर जाऊ नये, यासाठी प्रशासन आणि संबंधित शैक्षणिक संस्थांनी सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा सहारा बहुद्देशीय संस्थेने व्यक्त केली आहे.

सार्वजनिक वाचनालय नशिराबाद येथे वाचन प्रेरणा दिन उत्साहात

योगेशभाऊ पाटील यांच्या हस्ते अब्दुल कलाम यांना अभिवादन

जन सम्राट टाईम्स



नशिराबाद । प्रतिनिधी : भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि युवकांचे प्रेरणास्थान डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त सार्वजनिक वाचनालय, नशिराबाद येथे १५ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी लोकनियुक्त नगराध्यक्ष योगेशभाऊ पाटील यांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. डॉ. अब्दुल कलाम यांनी आपल्या कार्यातून शिक्षण, विज्ञान, संशोधन आणि वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, युवकांमध्ये ज्ञानाची भूक वाढावी आणि समाजात वाचन संस्कृती रुजावी, हा वाचन प्रेरणा दिनाचा मुख्य उद्देश आहे. पुस्तकांच्या माध्यमातून व्यक्तीच्या विचारांना दिशा मिळते, ज्ञानात भर पडते आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे या उपक्रमातून अधोरेखित करण्यात आले. सार्वजनिक वाचनालय, नशिराबाद हे वाचकांना दर्जेदार पुस्तके, वर्तमानपत्रे आणि विविध नियतकालिके उपलब्ध करून देत वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्याचे कार्य करीत आहे. बदलत्या डिजिटल युगातही पुस्तकांचे महत्त्व कायम असून, वाचनाची सवय नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी वाचनालयांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. या प्रसंगी डॉ. दीपक लोखंडे, डॉ. संदीप महाजन, वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. प्रमोद आमोदकर, कार्याध्यक्ष जनार्दन माळी, सेक्रेटरी प्रदीप देशपांडे, जितेंद्र महाजन, बी. आर. खंडारे, राजेश्वर धर्माधिकारी, मिठाराम म्हसकर, मनोज नाईक, प्रा. विनायक कोष्टी, ग्रंथपाल अनुराधा तारकस, शिपाई सुधाकर महाजन, वाचक दगडू माळी, दगडू कोष्टी आणि मंदार वाणी यांच्यासह अनेक वाचक उपस्थित होते. वाचनातून ज्ञान, विचारांतून प्रगती! वाचन ही केवळ सवय नसून ज्ञानप्राप्ती, वैचारिक प्रगल्भता आणि व्यक्तिमत्त्व विकासाची गुरुकिल्ली आहे. वाचनाची आवड जोपासावी तसेच नव्या पिढीमध्ये वाचन संस्कृती रुजविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि युवकांचे प्रेरणास्थान डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त सार्वजनिक वाचनालय, रोजी वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी लोकनियुक्त नगराध्यक्ष योगेशभाऊ पाटील यांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.

आपत्ती व्यवस्थापनाचे विद्यार्थ्यांना धडे न्यू इंग्लिश स्कूल, नशिराबाद येथे मार्गदर्शन वर्ग

अग्निशामक यंत्राचा वापर, प्रथमोपचार आणि सीपीआरचे प्रात्यक्षिक

जन सम्राट टाईम्स



नशिराबाद । (प्रतिनिधी): नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींचा सामना करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण होणे आवश्यक आहे. आपत्तीच्या प्रसंगी घाबरून न जाता प्रसंगावधान राखणे, सुरक्षिततेचे नियम पाळणे आणि योग्य वेळी मदत करणे या बाबींचे महत्त्व लक्षात घेऊन न्यू इंग्लिश स्कूल, नशिराबाद येथे विद्यार्थ्यांसाठी आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन वर्गाचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागामार्फत राष्ट्रीय शाळा सुरक्षा धोरणांतर्गत राज्यातील नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापन आणि आपत्तीपूर्व तयारी याबाबत जनजागृती करण्यात येत आहे. याच उपक्रमांतर्गत नशिराबाद येथील न्यू इंग्लिश स्कूलमधील नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. नाशिक येथील प्रशिक्षक फहीम पटेल यांनी विद्यार्थ्यांना नैसर्गिक तसेच मानवनिर्मित आपत्तींच्या वेळी घ्यावयाची खबरदारी आणि आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या उपाययोजनांची माहिती दिली. मार्गदर्शनादरम्यान विद्यार्थ्यांना अग्निशामक यंत्राचा योग्य वापर, भूकंपाच्या वेळी घ्यावयाची दक्षता, प्रथमोपचार आणि सीपीआर (कार्डिओपल्मोनरी रिससिटेशन) याबाबत प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देण्यात आले. आपत्तीच्या वेळी स्वतःची आणि इतरांची सुरक्षितता कशी जपावी, जखमी व्यक्तीला प्राथमिक मदत कशी करावी तसेच आपत्कालीन परिस्थितीत योग्य निर्णय कसा घ्यावा, याविषयी प्रशिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे व्यावहारिक ज्ञान मिळण्यास मदत झाली. कार्यक्रमाला शाळेच्या मुख्याध्यापिका एस. ए. बनसोडे, पर्यवेक्षक एस. एन. पाचपांडे यांच्यासह शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस. आर. झोपे यांनी केले. नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींचा सामना करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण होणे आवश्यक आहे. आपत्तीच्या प्रसंगी घाबरून न जाता प्रसंगावधान राखणे, सुरक्षिततेचे नियम पाळणे आणि योग्य वेळी मदत करणे या बाबींचे महत्त्व लक्षात घेऊन न्यू इंग्लिश स्कूल, नशिराबाद येथे विद्यार्थ्यांसाठी आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन वर्गाचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागामार्फत राष्ट्रीय शाळा सुरक्षा धोरणांतर्गत राज्यातील नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापन आणि आपत्तीपूर्व तयारी याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळा किन्हीचा गटशिक्षणाधिकाऱ्यांकडून गौरव!

जन सम्राट टाईम्स

सोयगाव। प्रतिनिधी: सोयगाव : तालुक्यातील जिल्हा परिषद डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळा, किन्ही येथील शैक्षणिक गुणवत्ता, शिक्षकांचे अध्यापन कौशल्य आणि शालेय व्यवस्थापनाचे पंचायत समिती सोयगावचे गटशिक्षणाधिकारी अक्षय धंदरे यांनी कौतुक केले. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केल्यानंतर त्यांनी अभिनंदन पत्राद्वारे शाळेतील शिक्षक आणि मुख्याध्यापकांच्या कार्याची प्रशंसा केली. या गौरवाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष विजय निकम यांनी गटशिक्षणाधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.



शाळेतील शैक्षणिक गुणवत्तेची पाहणी गटशिक्षणाधिकारी अक्षय धंदरे यांनी शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थी उपस्थिती, शिक्षकांची अध्यापन पद्धत, शालेय परिसरातील स्वच्छता आणि परसबागेची पाहणी केली. शाळेतील शैक्षणिक वातावरण आणि विविध उपक्रमांबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी त्यांनी इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या अध्ययनाची माहिती घेतली. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षक घेत असलेले परिश्रम आणि मुख्याध्यापकांचे शालेय नियोजन यांचे त्यांनी विशेष कौतुक केले. शिक्षकांच्या परिश्रमांना कौतुकाची थाप शाळेतील शिक्षक सुनील पाटील, स्नेहल पाटील आणि योगेश माळी यांच्या अध्यापन कौशल्याचे, तसेच मुख्याध्यापक सुभाष परदेशी यांच्या शालेय नियोजनाचे गटशिक्षणाधिकारी धंदरे यांनी अभिनंदन पत्राद्वारे कौतुक केले. या गौरवामुळे शाळेतील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी आणखी प्रेरणा मिळाली आहे. 'शिक्षकांच्या मेहनतीचा सन्मान' या अभिनंदनाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष विजय निकम यांनी गटशिक्षणाधिकारी अक्षय धंदरे यांचे जाहीर आभार व्यक्त केले. "आपण दिलेले हे अभिनंदन पत्र म्हणजे आमच्या शिक्षकांच्या अथक परिश्रमांवर उमटवलेली कौतुकाची थाप आहे.

आपल्या या कौतुकामुळे आमचे शिक्षक आणि विद्यार्थी निश्चितच आणखी जोमाने काम करतील आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळेचे नाव जिल्ह्यात अव्वल स्थानी नेण्यासाठी प्रयत्न करतील," अशी भावना विजय निकम यांनी व्यक्त केली.

गटशिक्षणाधिकाऱ्यांनी केलेल्या या गौरवामुळे शाळेच्या शैक्षणिक वाटचालीला प्रोत्साहन मिळाले असून, विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणे, शिस्त आणि स्वच्छता जपणे तसेच प्रभावी अध्यापनातून शैक्षणिक प्रगती साधणे यासाठी शिक्षकांना नवी ऊर्जा मिळाली आहे.

कुऱ्हा हरदो शाळेत वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा!

'एक तास महापुरुषांसाठी' उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व; पुस्तक वाचनातून ज्ञानाची गोडी

जन सम्राट टाईम्स

कुऱ्हा हरदो । प्रतिनिधी: विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, महापुरुषांचे विचार आत्मसात व्हावेत आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास व्हावा, या उद्देशाने जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कुऱ्हा हरदो येथे १५ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिन आणि जागतिक विद्यार्थी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. डॉ. वैशाली संसारे यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या 'एक तास महापुरुषांसाठी' या उपक्रमांतर्गत भारतरत्न, माजी राष्ट्रपती आणि 'मिसाईल मॅन' डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त विविध शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेतील विज्ञान शिक्षिका कुमुदिनी माहुरे यांच्या हस्ते डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पुस्तकांच्या वाचनातून व्यक्तिमत्त्व विकासाचा संदेश विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यात वाचनाची सवय विकसित व्हावी आणि भविष्यात स्पर्धा परीक्षांना सामोरे जाताना त्यांना त्याचा लाभ व्हावा, या उद्देशाने पुस्तकांचे महत्त्व पटवून देण्यात आले. विद्यार्थ्यांना विविध महापुरुषांची चरित्रात्मक पुस्तके वाचनासाठी उपलब्ध करून देण्यात आली. डॉ. अब्दुल कलाम यांच्या जीवनप्रवासातील प्रेरणादायी प्रसंग विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणांतून मांडले. इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी 'वाचा रे वाचा' या गीतातून वाचनाचे महत्त्व प्रभावीपणे विशद केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या भाषणांमधून त्यांची अभिव्यक्ती, आत्मविश्वास आणि महापुरुषांच्या विचारांविषयीची जिज्ञासा दिसून आली. भाषणानंतर प्रश्नमंजुषा; विद्यार्थ्यांना शैक्षणिक भेट विद्यार्थ्यांची आकलनक्षमता वाढविण्यासाठी भाषणांनंतर त्यावर आधारित प्रश्नमंजुषा घेण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना ऐकलेल्या आणि वाचलेल्या माहितीचे आकलन तपासण्याची संधी मिळाली. शाळेचे ग्रेडेड मुख्याध्यापक गजानन कोठाळे यांनी प्रत्येक विद्यार्थ्याला पेन, पेन्सिल, शार्पनर आणि खोडरबर यांचा कॉम्बो पॅक बक्षीस म्हणून दिला. या भेटीमुळे विद्यार्थ्यांना अभ्यास आणि लेखनासाठी प्रोत्साहन मिळाले. 'वाचू आनंदे, घडू आनंदे' उपक्रमातून मार्गदर्शन डायट, जळगाव यांच्या वतीने आयोजित 'वाचू आनंदे, घडू आनंदे' या विशेष संवाद उपक्रमाचे यूट्यूब लाइव्ह प्रक्षेपण विद्यार्थ्यांना सायंकाळी चार वाजता दाखविण्यात आले. या संवादातून शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी नेमके काय वाचावे, कसे वाचावे आणि वाचनाच्या माध्यमातून आनंदी व्यक्तिमत्त्व कसे घडवावे, याबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन मिळाले.



जागतिक विद्यार्थी दिन उत्साहात

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, महापुरुषांचे विचार आत्मसात व्हावेत आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास व्हावा, या उद्देशाने जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कुऱ्हा हरदो येथे १५ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिन आणि जागतिक विद्यार्थी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. शैलवड केंद्राच्या केंद्रप्रमुख प्रतिमा चौधरी यांचे या उपक्रमाला मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ग्रेडेड मुख्याध्यापक गजानन कोठाळे, पुनम वाघोदे, योगेश बोरोले, छाया बहुरूपे, नितीन लांडे, कुमुदिनी माहुरे आणि डॉ. वैशाली संसारे यांनी मोलाचे सहकार्य केले.

रेवती सुळे, जय पवार यांच्यावर नवी जबाबदारी

जन सम्राट टाईम्स

बारामती । प्रतिनिधी: बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या विश्वस्तपदी खासदार सुप्रिया सुळे यांच्या कन्या रेवती सुळे आणि राष्ट्रवादीचे युवा नेते जय पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संस्थेच्या ५४ व्या वर्धापनदिनानिमित्त शुक्रवारी (दि. १६ ऑक्टोबर) आयोजित कार्यक्रमात संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. अशोक प्रभुणे यांनी ही घोषणा केली.

या नियुक्तीमुळे विद्या प्रतिष्ठानच्या कामकाजात पवार कुटुंबातील नव्या पिढीचा सहभाग वाढणार आहे. विद्या प्रतिष्ठानच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते आणि संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. खासदार सुप्रिया सुळे यांच्या कन्या रेवती सुळे आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र जय पवार यांच्यावर विश्वस्तपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या घोषणेमुळे बारामतीच्या शैक्षणिक आणि राजकीय वर्तुळात या नियुक्तीची चर्चा सुरू झाली आहे. विद्या प्रतिष्ठानची स्थापना १६ ऑक्टोबर १९७२ रोजी झाली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सुरू झालेल्या या संस्थेने गेल्या पाच दशकांत शैक्षणिक क्षेत्रात मोठा विस्तार केला आहे. शाळा, महाविद्यालये तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या माध्यमातून संस्थेने विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या आहेत.